N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0043 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/02/2025 23:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 336(1) |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 336(2) |
| 3 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 336(3) |
| 4 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 338 |
| 5 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 340(2) |
| 6 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 341(1) |
| 7 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 341(2) |
| 8 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 19/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2024
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/02/2025 **Time (वेळ):** 22:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2025 22:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** शिक्षणाधिकारी कार्यालय पुणे श

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अमोल बबन भोसले

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सी-5, मेघाली बिल्डींग,ओरियन कम्प्लेक्स, औंध रोड,खडकी, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527317522

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ड. दिपक चांदणे | | | 1. पिंपरी चिंचवड पुणे शहर , बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी अमोल बबन भोसले, वय 40 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, रा.सी-5,मेघाली बिल्डींग, ओरियन कॉम्प्लेक्स, औंध रोड, खडकी, पुणे -411020 मो. नं. 9527317527

सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिनांक 22/09/2024 रोजीपासुन कार्यरत आहे. दिनांक 27/12/2024 रोजी अर्जदार श्री मंगेश कदम , अधीक्षक , शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांनी (शिक्षणाधिकारी (माध्यमिक) करिता) अशी सही करुन जा.क्र. जि.प. /शिक्षण/माध्य/कार्या.क्र. 12/12892/2024 दिनांक 27/12/2024 अन्वये रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे तक्रारी अर्ज दिला. सदर चौकशीकामी मला सह अधिकारी म्हणुन नियुक्त केलेले असून तक्रारीतील अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, "पुणे जिल्हयांतर्गत असलेल्या खाजगी माध्यमिक शाळांचे आस्थापना मान्यतेचे प्रस्ताव त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त होत असतात. त्यानुसार सदर प्रस्तावांना नियमानुसार मान्यता देणेबाबतची कार्यवाही त्यांचे कार्यालयाच्या स्तरावरुन करणेत येते. पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे या संस्थेतील कलाशिक्षक अपदवीधर एटीडी (आर्ट टिचर डिप्लोमा) वरुन पदवीधर एएम(आर्ट मास्टर्स )पदावरील वेतनश्रेणीस मान्यता देणेबाबतच्या आशयाचा शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :माशाह 75125 / प्र.क्र. 7514606 /24/एसएम-1 दि. 25 ऑक्टोबर 2024' बनावट शासन निर्णय त्यांचे कार्यालयाच्या निदर्शनास आला तसेच वरील नमुद शासन निर्णयाचा संदर्भ टाकुन शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या नावाने जा. क्र. शिक्षण /का-167 कला शिक्षक/प्रस्ता/वे.श्रे.मा/3908/2024 पुणे दिनांक 09/12/2024' हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या सह्यांचा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे 50 कलाशिक्षक यांना एटीडी वरुन एएम वेतन्नोत्ती देण्याबाबतचा बनावट आदेश तयार केलेला असल्याचे त्यांचे निदर्शनास आले त्यामुळे सदर बनावट डिजीटल सहयांचा शासन निर्णय व या कार्यालयाच्या पत्रान्वये कोणतेही अनुषंगिक आर्थिक लाभ संबंधितास देणेत आलेले नाहीत. सदर बनावट शासन निर्णय व या कार्यालयाच्या तयार केलेल्या बनावट आदेशानुसार शासनास कळविणेत आले असता सदर बनावट शासन निर्णय व संबंधित कागदपत्रांसह लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रितसर तक्रार दाखल करणेबाबत मा. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र. संकिर्ण 2024/प्रक्र.953/टिएनटी-1, दि. 26/12/2024 अन्वये आदेशीत करण्यात आल्याने तक्रारी अर्ज केला आहे."

वरील तक्रार अर्ज सहा.पोलीस आयुक्त निता मिसाळ यांचेकडे चौकशीकरीता देण्यात आला असता त्यांनी

सदर प्रकरणामध्ये दिनांक 27/12/2024 रोजी जा.क्र. एनसीएम/सपोआ/लाप्रवि/पुणे/2024-3022 दि. 27/12/2024 अन्वये प्रथमदर्शनी यामध्ये लोकसेवकाचा सहभाग असण्याची शक्यता असल्याने भ. प्र.का. कलम 17-अ प्रमाणे अहवाल सादर केला असता मुख्यालयाकडील जा.क्र. लाप्रवि/पुणे परिक्षेत्र/मुख्या/डी-760/पुणे/2024-119 दि. 03/01/2025 अन्वये सदर प्रकरणामध्ये उघड चौकशी करणेबाबत आदेश प्राप्त झाले. त्यानुसार पुढील चौकशी करणेकामी पोलीस अधीक्षक लाप्रवि यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.प्राधीकृत आदेश/चौ(उ)/01/पुणे/2025-31 दि. 03/01/2025 अन्वये सदर प्रकरणामध्ये उघड चौकशी करणे बाबत सपोआ निता मिसाळ यांना आदेशीत करण्यात आले व सह चौकशी अधिकारी म्हणुन आम्हास आदेश देण्यात आले आहेत.

प्रस्तुत उघड चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, शिक्षणाधिकारी(माध्यमिक) ,डॉ. भाऊसाहेब कारेकर यांचे कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक श्री शैलेंद्र पाटील यांनी वर नमुद बनावट शासन निर्णय दिनांक 15/11/2024 रोजी शिक्षणाधिकारी श्री. कारेकर यांना व्हॉट्सअॅपद्वारे पाठविला होता. तो शासन निर्णय त्यावेळी श्री. कारेकर यांनी चेक केला परंतु त्यावेळी तो बनावट असल्याची शंका त्यांना आली नाही. त्यानंतर दिनांक 20/12/2024 रोजी पुन्हा श्री.शैलेंद्र पाटील यांनी श्री.कारेकर यांचे स्वाक्षरीचा आदेश श्री.कारेकर यांना दाखवुन हा आदेश आपण काढला आहात का अशी विचारणा केली. त्यावरुन कारेकर यांनी नमुद आदेश त्यांनी काढला नसल्याचे सांगितले. तसेच त्यावेळी त्यांचे लक्षात आले की, नमुद आदेशामधील दिलेला संदर्भ हा वरील बनावट शासन निर्णयाचा संदर्भ आहे.

तो शासन निर्णय त्यांना संकेतस्थळावर नसल्याचे दिसुन आले. म्हणुन त्यांनी सदर शासन निर्णयावर अवर सचिव, महाराष्ट्र शासन श्री प्रविण मुंढे यांची बनावट डिजीटल सही असल्याने त्यांना सदर शासन निर्णयाबाबत विचारणा करता तो शासन निर्णय बनावट असल्याचे त्यांचे निदर्शनास आले. यावरुन अवर सचिव , श्री प्रविण मुंढे यांचा समक्ष जबाब नोंदवला असता शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय 'क्रमांक :माशाह 75125 / प्र.क्र. 7514606 /24/एसएम-1 दि. 25 ऑक्टोबर 2024' बनावट असुन त्यावर त्यांनी सही केली नसल्याचे सांगितले. तसेच डॉ. भाऊसाहेब कारेकर यांचा देखील जबाब नोंदविण्यात आला असुन त्यांनी देखील वर नमुद शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या नावाने 'जा. क्र. शिक्षण /का-167 कला शिक्षक/प्रस्ता/वे.श्रे.मा/3908/2024 पुणे दिनांक 09/12/2024' या जा.क्र. नुसार काढलेला त्यांच्या सहीचा आदेश बनावट असल्याचे सांगितले.

शैलेंद्र पाटील यांचेकडे वरील शासन निर्णय व बनावट आदेशाबाबत विचारणा करता, नवभारत हायस्कुल, शिवणे येथील वरिष्ठ लिपीक श्रीमती मोरे यांनी दिनांक 15/11/2024 रोजी त्यांचे व्हॉट्सअॅप वर वरील बनावट शासन निर्णय पाठविला असेलबाबत सांगितले. परंतु त्यावेळी त्यांचेकडे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे कामकाज नसल्याने नमुद शासन निर्णय लगेच त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ,डॉ. कारेकर यांना पाठवला. त्यानंतर दिनांक 20/12/2024 रोजी वरिष्ठ लिपीक मोरे मॅडम यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या सह्यांचा पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे 50 कलाशिक्षक यांना एटीडी वरुन एएम वेतन्नोत्ती देण्याबाबतचा वरील आदेश व्हॉट्सअॅप द्वारे पाठविला. तो आदेश प्राप्त होताच त्यांनी तो शिक्षणाधिकारी श्री कारेकर यांना दाखवला. त्यावेळी तो बनावट असल्याचे निदर्शनास आले.

वरील माहितीवरुन दिनांक 04/01/2025 रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, अंतर्गत नवभारत हायस्कुल शिवणे येथील क्लर्क शुभांगी प्रकाश मोरे व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे कार्यकारी अधीक्षक श्री सिताराम अभंग यांचेकडे चौकशी करता दिनांक 15/11/2024 रोजी सेवानिवृत्त शिक्षक श्री अशोक लोणकर ( 50 कलाशिक्षकंपैकी एक) यांनी वरील शासन निर्णय क्लर्क मोरे यांना पाठवला होता. त्यावेळी त्यांनी तो शिक्षणाधिकारी कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक श्री शैलेंद्र पाटील यांना पाठवला होता. श्री लोणकर यांचे कडे विचारणा करता त्यांना तो ( 50 कलाशिक्षकंपैकी एक) नवभारत हायस्कुल येथील उपशिक्षीका श्रीमती स्मिता अहिरे यांनी पाठविल्याचे सांगितले. तसेच वरील बनावट आदेशाबाबत विचारणा करता श्रीमती मोरे यांनी सांगितले की, वरील बनावट आदेश हा 50 कलाशिक्षकांपैकी एक नवभारत हायस्कुल मधील कलाशिक्षक श्रीमती स्मिता अहिरे यांनी क्लर्क मोरे यांना दाखवला होता. त्यावेळी त्या आदेशाच्या प्रत्येक पानावर शिक्षणाधिकारी यांच्या सह्या नसल्याने त्यांनी अहिरे यांना प्रत्येक पानावर सह्या लागतील असे सांगितले असता काही दिवसांनी अहिरे यांनी प्रत्येक पानावर सह्या असलेला आदेश दाखवला व तो त्यांनी संस्थेमध्ये दिला.

त्यावरुन संस्थेचे कार्यकारी अधीक्षक श्री सिताराम अभंग यांचेकडे चौकशी करता त्यांचे म्हणणे असे की, त्यांचे संस्थेतील 50 कलाशिक्षकांचा एएम वेतन्नोतीचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयात दाखल केला होता व तो प्रलंबित होता. दिनांक 19/10/2024 रोजी स्मिता अहिरे यांनी अभंग यांना सांगितले की, त्यांचे प्रस्तावासंदर्भाने शासनाला पत्र दयायचे आहे. म्हणुन अभंग यांनी दिनांक 19/10/2024 रोजी त्यांचे कार्यालयीन

जा.क्र. पुजिशिम/आस्था 7/एएम मान्यता/2024-25/136-3 दि. 19/10/2024 अन्वयेचे पत्र तयार करुन स्मिता अहिरे यांचेकडे दिले. स्मिता अहिरे यांनी नमुद पत्र मंत्रालयामध्ये जमा केलेबाबतची पोच संस्थेमध्ये जमा केली. तसेच दिनांक 18/12/2024 रोजी स्मिता अहिरे यांनी शिक्षणाधिकारी कारेकर यांच्या सह्यांचा वरील बनावट आदेश संस्थेमध्ये आणुन स्वत: आवक ला जमा केला. कलाशिक्षक स्मिता आहिरे यांचेकडे विचारपुस करता स्मिता अहिरे , वय 55 वर्ष, या नवभारत हायस्कुल येथे उपशिक्षीका असुन वरील बनावट शासन निर्णय व बनावट आदेशामध्ये नमुद 50 कलाशिक्षकांपैकी एक आहेत. या 50 कलाशिक्षकांचा एएम वेतन्नोती प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता परंतु मान्यता येत नव्हती. म्हणुन कलाशिक्षकांच्या एका कार्यशाळेवेळी या सर्व कलाशिक्षकांनी कलाशिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष किरण सरोदे यांना या प्रस्तावा संदर्भाने पाठपुरावा करणेबाबत सांगितले होते. परंतु तरीही काम होत नव्हते. एप्रिल 2024 मध्ये स्मिता अहिरे या आजारी असताना त्यांचे कौटुंबिक व शालेयमित्र राजेंद्र वाघ यांनी अहिरे यांची ओळख त्यांचे मित्र डॉ. दिपक चांदणे (पुस्तक प्रकाशक) मो.नं.7498509626 यांचेशी करुन दिली. त्यावेळी चांदणे यांनी त्यांच्या सर्वत्र ओळखी आहेत असे सांगितल्याने त्यांचेशी एएम मान्यतेच्या प्रस्तावाबाबत बोलणे झाले व चांदणे यांनी काम करुन देतो असे सांगितले. त्यानंतर तीन चार दिवसांनी चांदणे यांनी आहिरे यांना फोन करुन ते कारेकर साहेबांसमोर आहेत तुमच काम होईल त्यासाठी तुमच्या प्रस्तावासंदर्भाने शासनास देण्यासाठी संस्थेचे पत्र लागेल असे सांगितले. त्यावरुन दिनांक 19/10/2024 रोजी श्रीमती अहिरे यांनी संस्थेचे कार्यकारी अभंग यांना भेटुन संस्थेचे पत्र घेतले व ते दि. 19/10/2024 रोजी चांदणे यांना दिले. त्यावेळी या कामासाठी 17 लाख रुपये लागतिल असे चांदणे यांनी सांगितले. वरील ए.एम. मान्यतेच्या प्रस्तावामध्ये नमुद 50 पैकी 49 कलाशिक्षकांनी याकामासाठी प्रत्येकी 35000/- प्रमाणे किरण सरोदे यांचे घरी रोखीने पैसे जमवले. ते पैसे सरोदे यांचेकडे होते. परंतु त्यांनी हे पैसे असलेली बॅग पुन्हा अहिरे यांचेकडे आणुन दिली. दिनांक 22/10/2024 रोजी श्रीमती अहिरे यांचा मुलगा सुमित याने 17 लाख रुपये असलेली बॅग ही चांदणे यांना देण्यासाठी राजेंद्र वाघ यांचेकडे दिली. दिनांक 22/10/2024 रोजी चांदणे व राजेंद्र वाघ यांनी श्रीमती अहिरे यांनी दिलेले पत्र मंत्रालयात दाखल केले. तसेच सुमित अहिरे याने दिलेली बॅग राजेंद्र वाघ यांनी चांदणे यांचेकडे दिल्याचे तसेच दोघांनी मंत्रालयामध्ये जावुन पत्र जमा केल्याचे राजेंद्र वाघ यांनी त्यांचे जबाबामध्ये सांगितले आहे. तसेच दि. 22/10/2024 रोजी सदर पत्र मंत्रालयामध्ये जमा केलेची पोच चांदणे यांनी स्मिता अहिरे यांना व्हॅाट्सअॅपद्वारे पाठवली जी त्यांनी संस्थेमध्ये जमा केली आहे.

दिनांक 02/11/2024 रोजी डॉ. दिपक चांदणे यांनी वरील बनावट शासन निर्णय श्रीमती अहिरे यांना व्हॅाट्सअॅपव्दारे पाठविला. दि. 19/11/2024 रोजी डॉ. दिपक चांदणे यांनी शिक्षणाधिकारी डॉ. कारेकर यांचे सहीचा वरील बनावट आदेश श्रीमती अहिरे यांना आणुन दिला. तो त्यांनी त्यांच्या नवभारत हायस्कुलच्या क्लर्क श्रीमती शुभांगी मोरे यांना दाखवला असता प्रत्येक पानावर सह्या असतात असे त्यांनी सांगितलेवरुन तो आदेश श्रीमती अहिरे यांनी पुन्हा चांदणे यांचेकडे दिला. दिनांक 26/11/2024 रोजी अहिरे यांना चांदणे यांने व्हॅाट्सअॅप मेसेज केला व त्यामध्ये मुंबई-2, Sir 1.5, Clerk 25 असे पाठवले. दि. 18/12/2024 रोजी चांदणे यांनी प्रत्येक पानावर सह्या असलेला आदेश पुन्हा श्रीमती अहिरे यांना स्वत: आणुन दिला . जो त्यांनी त्याचदिवशी संस्थेमध्ये जमा केला.

दिनांक 20/12/2024 रोजी संस्थेने सर्व 50 कलाशिक्षकांच्या शाळांना पुढील कार्यवाहीसाठी वर नमुद आदेश ईमेलद्वारे पाठविला. त्याचवेळी तो ईमेलवरील आदेश नवभारत हायस्कुलच्या क्लर्क शुभांगी मोरे यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयातील कनिष्ठ कनिष्ठ सहाय्यक शैलेंद्र पाटील यांना पाठवला व तो त्यांनी शिक्षणाधिकारी यांचे निदर्शनास आणुन दिला. त्यावेळी तो बनावट असल्याचे निदर्शनास आले.

एकंदरित डॉ. दिपक चांदणे (पुस्तक प्रकाशक) नावाच्या व्यक्तीने पुणे जिल्हा शिक्षण मंडळ,पुणे या संस्थेतील 50 कलाशिक्षकांपैकी एक असलेल्या श्रीमती स्मिता अहिरे यांना शिक्षणाधिकारी श्री. कारेकर हे मित्र असल्याचे व त्यांना वारंवार भेटत असल्याचे भासवून सर्व 50 कलाशिक्षकांचे अपदवीधर एटीडी (आर्ट टिचर डिप्लोमा) वरुन पदवीधर एएम (आर्ट मास्टर्स) पदावरील वेतनश्रेणीस मान्यता देणेबाबतचे काम करुन शासनाकडून आर्थिक लाभ मिळवुन देण्याच्या हेतुने अन्य अज्ञात लोकसेवक अथवा अज्ञात इसम यांचेशी संगनमत करुन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचा अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांची बनावट डिजीटल सही असलेला बनावट शासन निर्णय तयार केला. तसेच या बनावट शासन निर्णयाचा संदर्भ टाकुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक),पुणे यांचे बनावट सह्यांचा एएम मान्यतेचा बनावट आदेश तयार केला. या कामासाठी श्री दिपक चांदणे यांनी श्रीमती स्मिता अहिरे यांचेकडुन लोकसेवक शिक्षणाधिकारी श्री कारेकर यांचेकरीता 17 लाख रुपयांची मागणी करून ते प्राप्त केले. घेतले तसेच चांदणे यांनी अहिरे यांना मुंबई-2, Sir 1.5, Clerk 25 असा व्हॅाट्सअॅपव्दारे मेसेज पाठवुन डॉ. दिपक चांदणे यांनी शासकीय कामासाठी पैसे स्विकारल्याचे मान्य केल्याचे दिसून येते. तसेच अवर सचिव,

महाराष्ट्र शासन यांच्या बनावट डिजीटल सहीचा बनावट शासन निर्णय व शिक्षणाधिकारी(माध्यमिक),पुणे यांच्या बनावट सहीचा बनावट आदेश तो बनावट आहे याची माहिती असताना 50 कलाशिक्षक यांना एएम वेतन्नोती लाभ मिळवुन देण्याकरिता लाभार्थी असणा-या कलाशिक्षक श्रीमती अहिरे यांचेमार्फत संबंधित पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांचे कार्यालयात सादर केले त्यावरुन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने सदरचा बनावट आदेश लाभार्थी असणा-या 50 कलाशिक्षकांच्या शाळांना मेलद्वारे पाठविल्याचे झाले चौकशीमध्ये निष्पण्ण झाल्याने माझी श्री दिपक चांदणे (पुस्तक प्रकाशक) व इतर अज्ञात लोकसेवक अथवा अज्ञात ईसम यांचेविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 336(1)(2)(3), 338,340(2), 341(1)(2) व भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7अ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील जबाब हा माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

पुढील तपास - पोलीस उपअधीक्षक श्रीमती निता मिसाळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.मो क्र 9822214414

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RAVINDRA MANOHAR GAIKWAD(I (Inspector)) / POBN72854

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **or (किंवा)**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

एस. एच. ओ./ठाणे अंमलदार
डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर.

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAVINDRA MANOHA

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** POBN72854